ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Regn. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ४ फेब्रुवारी, १९५९ | अंक ५

## विविध माहिती

**भारतांत भांडवल गुंतविण्यास हरकत नाहीं**—ब्रिटनमधील कंपन्यांच्या एका गटाचे अध्यक्ष सर फ्रँक फिसॉन ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, भारतामधील आर्थिक व राजकीय वातावरण ब्रिटिश भांडवल गुंतविण्यास अनुकूल असें आहे. भारतामधील शेतीच्या भागांना ते भेट देणार आहेत व पिकावरील रोगनाशक औषधें वापरणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीची पहाणी करणार आहेत.

**उत्तरप्रदेशांतील करमणूक कर**—उत्तरप्रदेश सरकारनें राज्यांत घेण्यांत येणाऱ्या करमणुकीवरील कराच्या पद्धतींत बदल केला आहे. आतांपर्यंत तिकिटांना पडणाऱ्या पैशावर निरनिराळ्या दरांमध्यें कर आकारला जात असे. १९५९ च्या सुरुवातीपासून सरसकट ५० टक्के कर घेण्यांत येईल. सर्कस, हौशी कलावंतांचीं नाटकें, गाण्याच्या मैफिली, खेळ, इत्यादिबाबतींत कमी कर घेण्यांत येणार आहे.

**व्यापारी करारांतील अडथळे**—सोव्हिएट रशियाचे उपपंतप्रधान मि. मिकोयान ह्यांनीं अमेरिकेशीं व्यापार करण्याबद्दल सुचविलेल्या अटी अमेरिकेस मान्य झाल्या नाहींत. रशियाला अमेरिकेकडून अद्ययावत् यंत्रसामुग्री, औद्योगिक कच्च्या मालाच्या बदली, पाहिजे होती. पण अशा करारामुळें अमेरिकेला कच्चा माल पुरविणाऱ्या देशांवर परिणाम झाला असता म्हणून अमेरिकेनें करार केला नाहीं.

**चितळेनगरचा साखर कारखाना**—चितळेनगर येथील साखर कारखान्याचा कोनशिला-समारंभ मध्यवर्ती सरकारचे वाहतूकमंत्री श्री. स. का. पाटील ह्यांच्या हस्तें झाला कारखान्याच्या चालकांनीं सर्व यंत्रसामुग्री देशी घेण्याचें ठरविलें आहे. तज्ज्ञांच्या मतानें ती चांगलें काम देईल. यंत्रसामुग्रीसाठी सुमारें ४५ लाख रु. लागणार आहेत.

**भारतासाठी पोलंडचीं एंजिनें**—भारतामधील रेल्वेवर वापरण्यासाठी पोलंडकडे एंजिनांची मागणी नोंदविण्यांत आली होती. त्यापैकी ४ एंजिनें लवकरच मुंबई बंदरांत येतील. पोलंडकडून मिळणाऱ्या एंजिनांचा हा दुसरा हप्ता आहे. येणाऱ्या एंजिनांपैकी सर्वांत अधिक एंजिनें मध्यरेल्वेसाठी राखून ठेवण्यांत आलीं आहेत.

**इजिप्तसाठी रशिअन पाणबुड्या**—इजिप्तच्या पाणबुड्यांच्या संख्येंत आणखी तीन नव्या रशिअन पाणबुड्यांची भर पडली आहे. आतां इजिप्तजवळ ९ पाणबुड्या झाल्या असून त्या सर्व रशिअन बनावटीच्या आहेत. संयुक्त अरब संघाची नाविक शक्ति आतां तुर्कस्थानच्या किंवा ग्रीसच्या तोलाची झाली आहे. सर्व पाणबुड्यांवरील अधिकारी अरब आहेत.

**विमेदारांना बोनस**—आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं असें सांगितलें आहे कीं, १९५६ व १९५७ सालांसाठी विमेदारांना मिळावयाचे बोनस तीन महिन्यांच्या अवधींत जाहीर करण्यांत येईल. ग्रामीण भागांतील विमेदारांची वैद्यकीय तपासणी न करतां त्यांना कांहीं मर्यादेपर्यंत विमापत्रकें देण्याचा विचार चालू आहे, अशीहि माहिती त्यांनीं दिली.

**कुलाबा जिल्ह्याचा विकास**—मुंबई राज्याचे सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री श्री. डी. एस्. देसाई ह्यांनीं पेण येथें अशी माहिती सांगितली कीं, कुलाबा जिल्ह्यांतील रस्त्यांच्या वाढीसाठी १ कोटी रुपये आणिं इमारतीसाठी १५ लाख रुपयांची रकम मंजूर करण्यांत आली आहे. कोंकण विभागाचा विकास करण्याच्या प्रयत्नांचा हा भाग आहे.

**केरळमधील कामगारांचें वेतन**—केरळ सरकारच्या आकडेविषयक खात्यानें प्रसिद्ध केलेल्या माहितीप्रमाणें १९५७ सालीं केरळमधील औद्योगिक कामगारांचें मासिक सरासरी उत्पन्न ४७-५२ रुपये होतें. १९५७-५८ सालीं केरळमधील १,६११ कारखान्यांतून ९८,२०० कामगार काम करीत होते.

**पाकिस्तानसाठी जेट बॉंबफेकी विमानें**—पाकिस्तानच्या विमानदलाचे प्रमुख मि. अशगर खान ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, पाकिस्तान लवकरच जेट एंजिनांची बॉंब फेकणारीं विमानें घेणार आहे. हीं विमानें लष्करी मदत म्हणून अमेरिका देणार काय ? ह्यासंबंधीं त्यांनीं मुग्धता स्वीकारली.

**खांद्यावर घेण्यासारखी मोटार**—डेनमार्कमधील एका यंत्रज्ञानें खांद्यावर घेतां येईल इतक्या हलक्या वजनाची मोटार तयार केली आहे. मोटारीला मोटारसायकलचें एंजिन असून शक्य तों सर्व भाग प्लॅस्टिकचा बनविण्यांत आला आहे. मोटारीची किंमत २०० पौंड ठेवण्यांत आली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**बाहुल्यांचें प्रदर्शन**—फेब्रुआरीच्या दुसऱ्या आठवड्यांत त्रिवेंद्रम येथें बाहुल्यांचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ५० देशांतून सुमारें २,५०० बाहुल्या प्रदर्शनांत मांडण्यांत येणार आहेत. गेल्या वर्षी हें प्रदर्शन दिल्ली येथें भरविण्यांत आलें होतें. सर्वांत अधिक बाहुल्या भारतानें तयार केलेल्या असतील. भारताच्या खालोखाल रशिआ, चीन व जपान ह्यांचे अनुक्रम लागतात.

**मिशनऱ्यांना आलेली मदत**—गेल्या सालच्या जून महिनाअखेर संपलेल्या २॥ वर्षांच्या काळांत भारतांत काम करीत असलेल्या परदेशीय मिशनऱ्यांना परदेशांकडून सुमारें २४ कोटी रुपयांची रक्कम आली. १९५६ सालीं ९२८ लाख रु. व १९५७ सालीं ९५३ लाख रु. आले होते. १९५८च्या पहिल्या सहामाहींत परदेशांकडून ५०० लाख रु. आले. जानेवारी १९५८ मध्यें भारतामधील नोंदलेल्या मिशनऱ्यांची संख्या ४,८४४ होती.

**स्त्रीला हायकोर्ट जज्जाचा मान !**—केरळमध्यें हायकोर्ट जज्जाच्या जागेवर एका स्त्रीची नेमणूक होण्याचा बराच संभव आहे. ह्या स्त्रीचें नांव श्रीमती अन्नाचेट्टी असें असून त्या सध्या डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्जाचें काम करीत आहेत. त्यांची नेमणूक झाल्यास हायकोर्ट जज्जाच्या अधिकारावर स्थानापन्न झालेली भारतामधील पहिली स्त्री, अशी त्यांची कीर्ति होईल.

**आरामशीर बोटीचा प्रवास**—सुप्रसिद्ध कुनार्ड बोट कंपनीची ३४,१७२ टन वजनाची 'कॅरोनिआ' ही बोट मार्च महिन्यांत मुंबईला येणार आहे. सुखसोयींनीं समृद्ध अशी ही बोट न्यूयॉर्कहून निघाली आहे. ३५६ प्रवाशांना घेऊन १०८ दिवसांत ती पृथ्वीप्रदक्षिणा करणार आहे. तिचा एकूण प्रवास ३३,००० मैल होईल.

**मच्छीमारीच्या बोटीची देणगी**—अमेरिकेच्या तांत्रिक सहकार मंडळातर्फे खोल समुद्रांत मच्छीमारी करण्यासाठी एक बोट भारत सरकारला देणगी म्हणून देण्यांत आली आहे. मुंबई येथें ह्याविषयीं चालविण्यांत येणाऱ्या केंद्राला ह्यापूर्वी अशा प्रकारच्या दोन बोटी मिळाल्या आहेत. नव्यानें मिळालेली बोट तिसरी आहे.

**मोटारगाड्यांचें जागतिक उत्पादन**
**( हजारांचे आंकडे )**

| | मोटार गाड्या | | भाड्याच्या गाड्या | | एकूण मोटार वाहनें | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९५५ | १९५७ | १९५५ | १९५७ | १९५४ | १९५६ | १९५७ |
| युनायटेड स्टेट्स | ७·९२० | ६·११५ | १·२४९ | १·०८७ | ६·६०१ | ६·९२० | ७·२०२ |
| जर्मन फे. रिपब्लिक | ७६२ | १·०४० | १४७ | १७२ | ६८१ | १·०७३ | १·२१२ |
| ग्रेट ब्रिटन | ८९७ | ८६१ | ३४१ | २९० | १·०३९ | १·००७ | १·१५१ |
| फ्रान्स | ५६१ | ७३८ | १६४ | १९० | ६०० | ८२७ | ९२८ |
| कॅनडा | ३७५ | ३४५ | ७९ | ७२ | ३५० | ४७४ | ४१७ |
| इटली | २३१ | ३१९ | ३८ | ३३ | २१७ | ३१६ | ३५२ |
| स्वीडन | ३३ | ५३ | १७ | १९ | ४५ | ५७ | ७२ |
| | १०·७७९ | ९·४७१ | २·०३५ | १·८६३ | ९·५३३ | १०·६७४ | ११·३३४ |
| जपान | १३ | — | ४७ | — | ६१ | १०१ | — |
| ऑस्ट्रेलिया | ४७ | — | १७ | — | ५५ | ६९ | — |
| इतर | — | — | १२ | — | १० | ९ | — |
| | १०·८३९ | ९·४७१ | २·१११ | १·८६३ | ९·६५९ | १०·८५३ | ११·३३४ |

**मोटारींची जागतिक निर्गत**
**( आंकडे हजारांचे )**

| | मोटार गाड्या | | भाड्याच्या गाड्या | | एकूण | | निर्गतीचें उत्पादनाशीं प्रमाण % | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९५६ | १९५७ | १९५६ | १९५७ | १९५६ | १९५७ | १९५६ | १९५७ |
| ग्रेट ब्रिटन | ३३७ | ४२६ | १२७ | १२३ | ४६४ | ५४९ | ४६·१ | ४७·७ |
| यु. स्टेट्स | १७५ | १३५ | १९७ | १९२ | ३७२ | ३२७ | ५·४ | ४·५ |
| जर्मन फे. रिपब्लिक | ३८२ | ५०३ | १०३ | ८१ | ४८५ | ५८४ | ४५·२ | ४८·२ |
| फ्रान्स | १५२ | २१९ | २५ | ३३ | १७७ | २५२ | २१·४ | २७·२ |
| कॅनडा | १४ | १८ | ५ | ५ | १९ | २३ | ४·० | ५·५ |
| इटली | ७८ | १११ | ९ | ८ | ८७ | ११९ | २७·५ | ३३·८ |
| एकूण | १,१३८ | १,४१२ | ४६६ | ४४२ | १,६०४ | १,८५४ | १५·१ | १६·६ |

# अर्थ

बुधवार, ता. ४ फेब्रुवारी, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेच्या कारखान्यांच्या कांहीं अडचणी

गेल्या दहा वर्षांत भारतामधील साखर कारखान्यांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावें लागलें. साखरेचा तुटवडा आणि चढ्या किंमती ह्या गोष्टी दरसाल अनुभवाला येत होत्या. त्यामुळें सरकारला मध्यें पडून नियंत्रणाचा व आयातीचा आधार घ्यावा लागला. सुमारें तीन वर्षांपूर्वीपासून ह्या परिस्थितींत सुधारणा होऊन साखरेच्या बाबतींत स्वयंपूर्णता प्राप्त झाली. उत्पादनहि चांगलें वाढलें. १९५७ सालीं १२ कोटी रुपयांची साखर निर्यात करण्यांत आली. त्यामुळें पूर्वी साखरेच्या आयातीवर करण्यांत आलेल्या परदेशीय हुंडणावळीचा खर्च भरून आला. देशांतील सध्यांचें साखरेचें उत्पादन वाढत्या मागणीला जेमतेम पुरें पडेल इतकेंच असल्यानें ह्या धंद्याचें भवितव्य उज्ज्वल राहण्यास हरकत नाहीं असें वाटतें. पण इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या म्हणण्याप्रमाणें तसें नाहीं. असोसिएशनच्या मतानें ह्या गोष्टीस तीन प्रमुख कारणें आहेत. ( १ ) ह्या धंद्यावरील नियंत्रणामुळें नफ्याची कूस थोडी आहे. त्यामुळें नव्या भांडवल गुंतवणुकीस उत्तेजक परिस्थिति नाहीं. शिवाय, नवीन गुंतवणूक सरकारतर्फे होत असून ती सहकारी साखर कारखान्यांतून करण्यांत येत आहे. ( २ ) उत्तर भारतामधील कारखान्यांना खंडसारी साखरेच्या छोट्या कारखान्यांकडून होणाऱ्या स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. ह्या कारखान्यांना उसावरील पट्टी अगर अबकारी कर द्यावा लागत नाहीं. त्यामुळें त्यांना मणामागें १३ रु. कमी किंमत घेणें परवडते. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, मोठ्या कारखान्यांना उसाचा तुटवडा पडूं लागला असून अन्याय्य स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. खंडसारी पद्धतीनें साखर तयार करण्यांत साखरेचा उतारा ७ टक्केच पडतो. मोठ्या कारखान्यांत पडणाऱ्या उताऱ्याच्या मानानें हा उतारा दोन तृतीयांशच असतो. अर्थातच साखरेसाठीं लागणाऱ्या मुख्य कच्च्या मालाचा म्हणजे उसाचा पूर्ण उपयोग करून घेतला जात नाहीं. उसाच्या तुटवड्याच्या परिस्थितींत ही गोष्ट विशेषच चिंतनीय आहे. ( ३ ) उत्तर प्रदेशांत व बिहारमध्यें उसाच्या किंमती वाढवून मिळण्याबद्दल राजकीय हेतूनें सारखी चळवळ करण्यांत येते. त्यामुळें कारखान्यांना उत्पादनाची किंमत कमी करण्याचे प्रयत्न नीटसे करता येत नाहींत.

असोसिएशनच्या ह्या बाजूला सर्वथैव मान्यता देण्याची प्रवृत्ति दिसून येत नाहीं. साखरेच्या धंद्यासंबंधीं ह्यापूर्वी जी तपासणी करण्यांत आली होती तीवरून ह्या धंद्यांतील रचनेचे दोष स्पष्ट झालेले आहेत. ह्यांपैकी सर्वांत महत्त्वाचा दोष हा आहे कीं, आर्थिक दृष्ट्या न परवडणारे असे लहान कारखाने बरेच आहेत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अशा कारखान्यांपैकी कांहीं कारखाने ज्या ठिकाणीं उसाचा पुरवठा अधिक मुबलक असेल अशा ठिकाणीं हलविण्याच्या योजना आंखण्यांत आल्या होत्या. असें झालें असतें तर हंगाम अधिक काळ चालला असता आणि उत्पादनाच्या खर्चांत घट झाली असती. पण आतां हा प्रयत्न सोडून देण्यांत आला आहे. कारण, कारखाने हलविल्यामुळें ज्या भागांत थोडेंच औद्योगीकरण झालें आहे त्या भागांतील औद्योगिक जीवन खुरटण्याची भीति व्यक्त करण्यांत आली. अर्थात् हें कारण अर्थशास्त्राच्या बाहेरील आहे. आहेत ते कारखाने अधिक बळकट आर्थिक पायावर उभे करण्याची कल्पना चांगली होती. पण प्रत्यक्ष व्यवहारांत खंडसारी साखर कारखान्यांकडे उसाचा अधिक पुरवठा होऊं लागल्यानें मोठ्या कारखान्यांतील साखरेचें उत्पादन घटण्याचा धोका निर्माण झाला आहे. पश्चिम उत्तर-प्रदेशांतील चालू हंगामाचें उत्पादन १,६०,००० टनांनीं कमी होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. हा धोका साखर उत्पादन करणाऱ्या देशाच्या इतर भागांतहि पसरण्याची शक्यता आहे. सरकारच्या करपद्धतीमधील धोरणाचाच हा अप्रत्यक्ष परिणाम आहे, असें म्हणतां येईल. साखर कारखानदारांचें म्हणणें असें आहे कीं कारखाने आर्थिक दृष्टीनें परवडण्यासाठी खंडसारी कारखान्यांना मुक्तहस्तानें परवाने देण्यांत येऊं नयेत. तसें झाल्यास साखर कारखान्यांसाठीं राखून ठेवलेल्या भागांत उसाचा पुरवठा योग्य प्रमाणांत होणें अशक्य होत जातें. दुसरी एक सूचना अशी करण्यांत येत आहे कीं, जे खंडसारी कारखाने औद्योगिक शक्तीचा उपयोग करतात त्यांच्यावर कमी दरांत का होईना पण अबकारी कर लादण्यांत यावा.

उत्तरप्रदेश, बिहार आणि पंजाब ह्यांमधील साखर कारखान्यांना कारखान्याच्या जागीं ठरवून देण्यांत आलेली दर मणी किंमत ३६ रु. आहे. ही किंमत उत्पादन-खर्च आणि साखरेच्या निर्यातींत होणारा तोटा भरून काढण्यास पुरेशी नाहीं, असा तेथील कारखान्यांचा दावा आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें ही किंमत ३९ रु. असावी असें आहे. पण साखरेच्या ग्राहकांच्या दृष्टीनें हें युक्त ठरणार नाहीं. शिवाय खंडसारी साखर व कारखान्यांची साखर ह्यांच्यामधील किंमतीची तफावत कमी करण्याची जी मागणी करण्यांत येत आहे तिचा आधार किंमतवाढीच्या सूचनेमुळें दुबळा होतो. ह्यासंबंधीं टॅरिफ कमिशन आपल्या सूचना लवकरच करणार आहे. आणखीहि एका प्रश्नाचा विचार करण्याचें सुचविण्यांत येत आहे. सध्या भारतामधील साखर परदेशांत निर्यात करण्यांत येते. ह्या साखरेला परदेशांतील साखरेशीं स्पर्धा करावी लागते. पण हें करण्यासाठीं भारतामधील सर्व कारखान्यांना एकाच प्रमाणांत घस सोसावी लागते. कांहीं कारखाने असे आहेत कीं, त्यांना अधिक दीर्घ हंगाम लाभतो, किंवा चांगल्या दर्जाच्या उसाचा पुरवठा होऊं शकतो. ज्या कारखान्यांना असे नैसर्गिक फायदे आहेत त्यांना निर्यातीच्या बाबतींत थोडी अधिक घस सोसावी लावण्यांत यावी असें इतर कारखान्यांचें मत आहे.

## भारतांतील सायकलींचा धंदा

भारतांत १९५७ मध्यें दर हजार माणसांमागें ११ जणांना स्वतःच्या सायकली होत्या. स्वातंत्र्यपूर्वकालांत व १९४९ मध्यें हें प्रमाण अनुक्रमें केवळ २ व ३·५ असें होतें. या देशांत सध्यां एकूण सुमारें ४० लाख सायकली चालू असून हा आंकडा १९६० पर्यंत ७० लाखांपर्यंत जाईल असा टॅरिफ कमिशनचा अंदाज आहे.

या देशांत सायकलींच्या उत्पादनास १९३८ मध्यें सुरुवात झाली असली तरी त्याची थोडीफार प्रगति १९४९ मध्यें या धंद्यास भारत सरकारनें प्रत्यक्ष साह्य व कांहीं परदेशांची मदत मिळायला लागल्यानंतरच झाली. भारतांत १९५१ मध्यें सायकलींचें उत्पादन करणारे फक्त दोनच कारखाने होते आणि त्यांचें उत्पादन १·४ लाख सायकली होतें. या कालांत प्रत्यक्षांत अंदाजें ४ ते ४॥ लाख सायकलींची मागणी होती. तथापि त्यानंतर अशा कारखान्यांची संख्या वाढल्यानें या उत्पादनांत १९५२ व ५३ मध्यें २ लाखांपर्यंत वाढ झाली. १९५४, ५५, ५६ व ५७ या वर्षांचे हे आंकडे अनुक्रमें ३·७, ४·९१, ६·६४ व ७·९१ लाख असे आहेत. १९५८ मध्यें १० लाख सायकलींचें उत्पादन अपेक्षित आहे.

सध्यां देशांत सायकलींचे २० मोठे व ७८ छोटे कारखाने असून त्यांत मार्च १९५६ अखेरच उत्पादनास सुरुवात झाली आहे. छोट्या कारखान्यांपैकी पंजाब, दिल्ली, प. बंगाल, उत्तर-प्रदेश, मुंबई, मध्यप्रदेश व मद्रास राज्यांतील कारखान्यांची संख्या अनुक्रमें २२, १४, १०, ९, ८, ४ व २ अशी आहे. त्याचप्रमाणें राजस्थान (५), म्हैसूर (२), आंध्र प्रदेश व ओरिसा (प्रत्येकी एक) राज्यांतील अशा कारखान्यांत लवकरच उत्पादनास प्रारंभ होण्याची अपेक्षा आहे.

सध्यां चालू असलेल्या २० मोठ्या कारखान्यांची राज्यनिहाय संख्या व कामाची एक पाळी ठेवून वार्षिक निर्धारित उत्पादनशक्ति पुढीलप्रमाणें आहे :—

| राज्य | कारखान्यांची संख्या | वार्षिक निर्धारित उत्पादनशक्ति |
|---|---|---|
| (१) मुंबई | १ | १,००,००० |
| (२) बिहार | १ | ६०,००० |
| (३) दिल्ली | २ | ८४,००० |
| (४) मद्रास | १ | २,००,००० |
| (५) पंजाब | ६ | २,२६,००० |
| (६) उत्तर प्रदेश | ६ | १,०५,००० |
| (७) पश्चिम बंगाल | ३ | १,५५,००० |
| एकूण | २० | ९,३०,००० |

मद्रासमधील टी. आय. सायकल्स्, कलकत्यांतील सेन-रॅले, सोनपत (पंजाब) येथील ॲटलास सायकल इंडस्ट्रीज व मुंबईतील हिंद सायकल्स हे सायकली तयार करणारे प्रमुख कारखाने असून पहिले दोन कारखाने ब्रिटिश कारखानदारांचें तांत्रिक साह्य घेत असतात. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत या धंद्यानें केलेल्या प्रगतीची कल्पना पुढील आंकडेवारीवरून येईल :—

### तयार सायकली

| वर्ष | भारतांत तयार झालेल्या (आंकडे हजारांचे) | आयात केलेल्या (आंकडे हजारांचे) | अंदाजी खप (हजारांत) |
|---|---|---|---|
| १९५०–५१ | १०१ | १६६ | २६७ |
| १९५१–५२ | १२० | २८३ | ४०३ |
| १९५२–५३ | २११ | १९८ | ४०८ |
| १९५३–५४ | २८९ | ९० | ३७९ |
| १९५४–५५ | ४०१ | ८९ | ४९० |
| १९५५–५६ | ५५० | १३० | ६८० |

### सायकलींचे सुटे भाग आणि इतर सामुग्री

| वर्ष | देशी उत्पादनाचें मूल्य (लक्ष रुपयांत)* | आयातीचें मूल्य (लक्ष रुपयांत) | एकूण मूल्य (अंदाजें) (लक्ष रुपयांत) |
|---|---|---|---|
| १९५०–५१ | ६४·५ | ९६·० | १६०·५ |
| १९५१–५२ | ८८·९ | १४४·३ | २३३·२ |
| १९५२–५३ | ७७·३ | १३५·५ | २१२·८ |
| १९५३–५४ | ९१·१ | ९४·९ | १८६·० |
| १९५४–५५ | ११८·६ | १७२·३ | २९०·९ |
| १९५५–५६ | १३६·५ | १७५·० | ३११·५ |

* विकास विभागाच्या यादीवर असलेल्या कारखान्यांच्या १९५० ते १९५५ या कॅलेंडर वर्षाच्या मुदतींतील हे आंकडे आहेत. या वर्षांतील कारखान्यांची संख्या पुढीलप्रमाणें वर्षागणिक वेगवेगळी होती. १९५०–१३, १९५१–१५, १९५२–२१, १९५३–२३, १९५४–२५, १९५५–२०.

या धंद्यास लागणारा बहुतेक कच्चा माल स्थानिक उपलब्ध असतो. १९५१ मधील सायकलींच्या टायरचें उत्पादन जें ३९·४ लक्ष होतें, तें १९५७ मध्यें वाढून ७१·५ लक्षांवर गेलें. याच मुदतींत ट्यूबचें उत्पादन सुमारें ४९ लक्षांवरून वाढून ७० लक्षांवर गेलें. सायकलीच्या टायर-ट्यूबची देशांतील वार्षिक मागणी प्रत्येकी अंदाजें ९० लक्ष आहे.

### भांडवल आणि कामगार

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभीं सहा प्रमुख उत्पादकांनीं मिळून एकूण १५७ लक्ष रु. भांडवल या धंद्यांत गुंतविलेलें होतें. त्यांपैकी यंत्रसामुग्रीवर ५२ लक्ष रु.; जमीन व इमारती ३७ लक्ष रु. आणि खेळतें भांडवल ६८ लक्ष रु. होतें.

या धंद्यांत १९५७ मध्यें सुमारें ८,००० कामगार कामावर होते. १९५१ मधील हाच आंकडा २,५४८ असा होता. १९६१ अखेरीपर्यंत ही संख्या १५,००० होईल असा अंदाज आहे.

### सायकलींची आयात

| वर्ष | संख्या | किंमत (लक्ष रुपयांत) |
|---|---|---|
| १९५१–५२ | २,८३,१२७ | २८३ |
| १९५२–५३ | १,९७,५६५ | २०९ |
| १९५३–५४ | ९०,३६३ | ९७ |
| १९५४–५५ | ८९,४१४ | ९० |
| १९५५–५६ | १,४७,००० | १४२ |
| १९५७* | ९०,१८० | ९८ |
| १९५८ (सहा महिने)* | १२,६७४ | १५ |

* (१९५७ पासून परकीय व्यापाराचे हिशोब कॅलेंडर वर्षाप्रमाणें ठेवण्यांत येतात.)

संपूर्ण सायकलींच्या गरजेच्या बाबतींत तरी ( १९६१ पर्यंत अंदाजें १५ लक्ष सायकली ) देश आतां स्वयंपूर्ण झालेला आहे व त्यामुळें १० कोटी रु. किंमतीचें परकीय चलन वांचविण्याची स्थिति आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुरेशा नसल्या तरी कांहीं प्रमाणांत सायकली निर्यात करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. इंजिनिअरिंग निर्यातवाढ मंडळाची एक समिति आतां सायकलींच्या निर्यातवाढीकडे लक्ष पुरवीत आहे. निर्यातवाढ मंडळास साह्यभूत होण्यासाठी सायकल विकास मंडळानें स्थायी-संपर्क समिति स्थापन केलेली आहे. अनेक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांतून भारतीय सायकली मांडण्यांत आलेल्या होत्या आणि भारत सरकारच्या परदेशांतील प्रदर्शनांतूनहि त्या मांडलेल्या असतात.

### पश्चिम विभागांतील कंपनी कायद्याचें कामकाज

**ऑक्टोबर-डिसेंबरचा आढावा**

एकतीस डिसेंबर, १९५८ रोजीं संपलेल्या तीन महिन्यांत कंपनी कायद्याचा भंग झालेल्या ४७ प्रकरणीं निकाल देण्यांत आला व त्यांपैकी सर्व प्रकरणांत गुन्हेगारांना शिक्षा झाल्या, असें मध्यप्रदेश आणि मुंबई राज्य मिळून बनलेल्या पश्चिम विभागांतील कंपनी कायद्याच्या प्रशासन विभागाच्या अहवालावरून दिसून येतें.

इंडियन कंपनीज ॲक्ट, १९१३ किंवा कंपनीज् ॲक्ट, १९५६ या कायद्यांतील तरतुदींचा भंग करणाऱ्या कंपन्या, पदाधिकारी किंवा ह्या दोघांवरहि या तिमाहींत एकूण ९२ प्रकरणीं खटले भरण्यांत आले. यांपैकी ५७ प्रकरणीं, ठरविलेल्या मुदतींत वार्षिक सर्वसाधारण सभा न भरविल्यामुळें खटले भरण्यांत आले होते व सोळा प्रकरणें जमाखर्च योग्य प्रकारें न ठेवण्याबाबतचीं होतीं.

**सहासष्ट नव्या कंपन्यांची नोंद**

या तिमाहींत पश्चिम विभागांत १९५६ च्या कंपनीकायद्यानुसार, एकूण २८,०९,९०,००० रुपये अधिकृत भांडवल असलेल्या सहासष्ट नव्या कंपन्यांची नोंद करण्यांत आली. यांपैकी तीन पब्लिक कंपन्या व ६० प्रायव्हेट कंपन्या मुंबई राज्यांत असून त्यांचें एकूण अधिकृत भांडवल अनुक्रमें २०,०५,५०,००० रुपये व ७,९६,४०,००० रुपये आहे. त्यासेरीज आणखी ६ लिमिटेड कंपन्या नोंदविण्यांत आल्या. एकूण ८१,१८,२५५ रुपये भांडवल वसूल झालेल्या २७ कंपन्या ऑक्टोबर ते डिसेंबर ह्या तिमाहींत बुडाल्या असल्याचें या अहवालांत म्हटलें आहे. त्यामागील तिमाहींतील हा आंकडा ३८ होता. या कायद्याच्या ५६० कलमानुसार ३३ कंपन्यांचीं नांवें नोंदणी बुकांतून काढून टाकण्यांत आलीं आहेत.

**दि स्टेट बँक ऑफ इंडिया**

दि स्टेट बँक ऑफ इंडियानें १९५८ मध्यें १·९ कोटी रु. नफा मिळविला. १९५७ मध्यें तो १·८७ कोटी रु. होता. प्रत्येक भागास १६ रु. डिव्हिडंड कायम राखण्यांत येईल.

**प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं. लि.**

३० जून, १९५८ अखेर, संपलेल्या वर्षासाठी प्रीमिअर ऑटोमोबाइल्स लि. नें ४% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. त्यापर्वीच्या वर्षी तें ६% होतें.


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

**शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

— शाखा —
(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा
(४) श्रीरामपूर (५) ओझर ( जि. नाशिक )
(६) खोपोली ( जि. कुलाबा ).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७७,००,०००चे वर |

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ शॉर्टटर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## चितळे शुगर वर्क्स लि. चा साखर कारखाना

### कोनशिला बसविण्याचा समारंभ

( चितळे शुगर वर्क्स लि. च्या साखरकारखान्याच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ भारत सरकारचे वाहतुक-दळणवळण मंत्रि श्री. स. का. पाटील ह्यांच्या हस्तें दि. २७ रोजीं मोठ्या थाटानें झाला. )

प्रत्येकास विदितच आहे कीं, साखरेच्या वाढत्या खपाची मागणी पुरविण्यासाठी भारतांत नवीन साखर कारखाने काढण्यास भारत सरकारनें नवीन जादा परवाने दिले आहेत. गेल्या दहाबारा वर्षांत भारतांतील साखरेचा खप जवळजवळ दुपटीनें वाढला असून ह्या खपाचें प्रमाण वाढतच आहे. लोकांच्या बदलत्या संवयीमुळें साखरेचा खप दररोज वाढत आहे व त्यामुळें साखरेची मागणीहि वाढत आहे. यामुळें जादा नवीन साखर कारखान्यास भारतांत भरपूर वाव आहे. हा नवीन साखर कारखाना सोलापूर जिल्ह्यांतील माळशिरस तालुक्यांत चितळेनगर येथें निघावयाचा आहे व ह्या ठिकाणीं परिस्थिति विशेष अनुकूल आहे. चितळे अग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स लि. या कंपनीच्या मालकीची चितळेनगर येथील शेतकी व औद्योगिक वसाहत ज्यांनीं यशस्वी रीतीनें स्थापन केली, त्याच श्री. श्री. द. चितळे व श्री. वा. द. चितळे या बंधुद्वयांनीं या साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली आहे.

हा नवीन साखर कारखाना निघावयाच्या ठिकाणीं म्हणजे चितळेनगर येथें इमारती, गोडाउन्स, मोटारी, लॉऱ्या, तेल साठविण्याच्या टाक्या, वर्कशॉप, यंत्रसामुग्री, वीज-गृह, रहावयाच्या इमारती, वगैरे साखर कारखान्यास अत्यंत आवश्यक असलेली बरीच मौलिक मालमत्ता ह्या नवीन साखर कारखान्यास तावडतोब वापरतां येण्यासारख्या स्थितींत उपलब्ध आहे. साखर कारखान्याची अत्यंत महत्त्वाची गरज ह्यामुळें तावडतोब भागली आहे.

ज्या ठिकाणीं या कंपनीचा साखर कारखाना निघणार आहे तें चितळेनगर ठिकाण दैवाच्या कक्षेबाहेर असलेल्या कालव्याच्या क्षेत्रांत(फ्रॉस्ट फ्री कॅनॉल झोनमध्यें)आहे. पाण्याचा मुबलक पुरवठा, पुरेसे कामगार व उसाचा वाजवी किंमतींत भरपूर पुरवठा, ह्या गोष्टींची तेथें अनुकूलता असून आजूबाजूला व्यापारी पेठा असल्यामुळें दूर पल्ल्यावर विक्रीसाठी माल वाहून नेण्याची आवश्यकता रहात नाहीं.

चितळेनगरचे आसपास आवश्यक उसाचा भरपूर पुरवठा उपलब्ध असून त्यांपैकी पुष्कळसा पुरवठा चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स लि. कडून केला जाईल. बाकीचा पुरवठा आसपासच्या बागाईतदारांकडून केला जाईल. थोडक्यांत, ह्या साखर कारखान्यास भरपूर कच्चा माल, मजूर व वहातूक. त्याचप्रमाणें निष्णात तज्ज्ञ-व्यवस्था, साखरेसाठी तयार व्यापारी पेठा व स्थानिक व्यापारी संबंध या सर्व गोष्टींची उत्तम अनुकूलता आहे.

ह्या साखर कारखान्यांत दररोज सुमारें १,००० पोतीं साखरेची पैदास होईल. भारतांत उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रींतूनच ही यंत्रसामुग्री खरीदली जाईल. हा साखर कारखाना चालू करण्यास अंदाजें ४५ लक्ष रुपये खर्च येईल. साखर कारखान्याच्या उभारणीस तावडतोब सुरुवात होऊन हा साखर कारखाना नोव्हेंबर १९५९ मध्यें चालू करण्याचें योजलें आहे.

११% रिकव्हरीच्या आधारानें सुमारें १,२०,००० टन ऊस भरडून सुमारें १,३२,००० साखरेचीं पोतीं तयार होतील. चालू बाजारभावानें दर पोत्यास साखरेची किंमत अंदाजें रुपये १०३ धरल्यास उत्पादन केलेल्या साखरेची किंमत अंदाजें रुपये १,३५,९६,००० (एक कोटी, पस्तीस लक्ष, शहाण्णव हजार रुपये ) होईल व उत्पादन खर्च अंदाजें खालीलप्रमाणें होईल—

| | रु. न. पैसे |
|---|---|
| (१) एक पोतें साखर तयार होण्यास लागणाऱ्या उसाची किंमत ... | ४४—५० |
| (२) मजुरी, पगार, रसायनें, स्पेअर्स, तेलें, यंत्राची दुरुस्ती, वगैरे उत्पादन-खर्च दर पोत्यास ... ... | १०—०० |
| (३) दर पोत्यावर घसारा ... ... | ३—७५ |
| (४) व्यवस्था खर्च ... ... | २—०० |
| (५) अबकारी कर दर पोत्यास ... | २९—१५ |
| (६) उसावरील कर दर पोत्यास ... | ४—६० |
| (७) व्याज वगैरे खर्च दर पोत्यास ... | ३—०० |
| | ९७—०० |
| नफा दर पोत्यास | ६—०० |
| एकूण रु. | १०३—०० |

वार्षिक सरासरी १,३२,००० पोत्यांच्या उत्पादनावर दर पोत्यास सहा रुपये नफ्याप्रमाणें एकूण अंदाजें रु. ७,९२,००० नफा होईल. टॅक्स, डिव्हिडंड वगैरे सर्व खर्च भागवून दरसाल कंपनीचे हातांत ह्या नफ्यांतून भरपूर शिल्लक राहील.

---

## दि मॉडेल को. हौसिंग सोसायटी लि.

### रौप्यमहोत्सव

पुण्यांतील दि मॉडेल को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या नामवंत सहकारी गृहमंडळीचा रौप्य महोत्सव दिनांक १४ जानेवारी १९५९ रोजीं सायंकाळीं डॉ. ए. यू. शेख, रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, पुणें, यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला.

ही सोसायटी दि. १३-१५ जानेवारी १९३४ रोजीं सहकारी सोसायट्यांच्या कायद्याखालीं नोंदविण्यांत आली. हल्लीं या सोसायटींचे २८ सभासद आहेत. तिनें दि. १२ जुलै १९३४ रोजीं पुणें शहर म्युनिसिपालिटीकडून सुमारें रु. ९१०० ला सहा एकर एक गुंठा क्षेत्राचा फायनल प्लॉट नं. ८८० भांबुर्डी (हल्लींची शिवाजीनगर पेठ) हा खरेदी केला. या जागेचे इमारती बांधण्यास सोयीचे असे तेहेतीस प्लॉट्स् पाडण्यांत आले. यांपैकी एक प्लॉट सोसायटीच्या सभासदांच्या सोयीसाठी इमारत बांधण्याकरितां राखून ठेवला असून बाकीचे बत्तीस प्लॉटस सभासदांना निरंतरच्या भाडेपट्ट्यानें देण्यांत आलेले आहेत. सोसायटीचें भाग भांडवल रु. १६,९५० असून तिनें रु. ८१,६०० च्या ठेवी स्वीकारल्या आहेत. गेल्या पंचवीस वर्षांत तिची गंगाजळी व इतर फंड सुमारें रु. १३,००० चे जमले आहेत. यांपैकी सोसायटीनें आपल्या सभासदांना घरें बांधण्यासाठी सुमारें रु. १,१०,००० कर्जाऊ दिलेले आहेत. यावरून तिची सांपत्तिक परिस्थिति समाधानकारक असल्याचें दिसतें.

रौप्य महोत्सवानिमित्त जी सभा भरली होती त्या सभेस सभासद व इतर प्रतिष्ठित नागरिक व सरकारी अम्मलदार असे सुमारें दोनशेंचेवर स्त्री-पुरुष हजर होते.

प्रारंभीं संस्थेचे अध्यक्ष श्री. द. दि. चितळे यांनीं स्वागतपर भाषण करून प्रमुख पाहुणे डॉ. ए. यू. शेख यांनीं अध्यक्ष या नात्यानें सभेचें काम पुढें चालवावें अशी त्यांना विनंती केली. त्यानंतर कार्यकारी मंडळाचे एक सभासद श्री. भी. रा. जोशी यांनीं समारंभानिमित्त आलेले संदेश सभेस वाचून दाखविले व कार्यकारी मंडळातर्फे संस्थेचा पंचवीस वर्षांचा त्रोटक अहवाल सभेस निवेदन केला. या अहवालांत संस्थेची अद्यावत् माहिती दिली असून शेवटीं चारपांच विचारार्ह सूचना (सरकारचीं दोन खातीं, एक सहकारीखातें व दुसरें पोलीसखातें यांना, तसेंच पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन यास ) केल्या आहेत. या सूचनांचा ज्या त्या खात्यांकडून योग्य तो विचार लवकरच होईल अशी आशा आहे.

नंतर श्री. दा. वा. पोतदार व श्री. गो. त्रिं. गोखले यांचीं समयोचित भाषणें झालीं.

त्यानंतर कार्यकारी मंडळाचे चेअरमन श्री. दा. ग. बापट यांनीं या समयीं संस्थेस आपल्या मालकीचा सुमारें रु. ५,००० किंमतीचा प्लॉट देणगीदाखल दिला असून ही देणगी कार्यकारी मंडळानें साभार स्वीकारली आहे हें जाहीर केलें.

नंतर डॉ. ए. यू. शेख यांनीं अध्यक्ष या नात्यानें भाषण केले. ते म्हणाले, "पुणें, मुंबई, वगैरेसारख्या वाढत्या वस्तीच्या शहरांतून या संस्थेसारख्या कार्यक्षम अशा अनेक संस्था स्थापन होणें जरूर असून त्या तशा स्थापन झाल्या तर मध्यमवर्गीयांना सोयीचीं अशीं घरें उपलब्ध करून देतां येतील अशी आशा आहे. सरकारामार्फत सहकारी गृहमंडळयांना व व्यक्तींना घरें बांधण्यासाठी बरीच मदत मिळत असते. परंतु महाराष्ट्र विभागांतील मंडळी या मदतीचा पुरेपूर उपयोग करून घेत नाहींत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशननें सरकारी मदत घेऊन गलिच्छ वस्त्यांचें अद्याप उच्चाटन केलें नाहीं, हें बरें नव्हें. इतर विभागांत यापेक्षा वेगळी परिस्थिति आहे. तिचा या विभागांतील मंडळींनीं विचार करावा. मॉडेल को. हौसिंग सोसायटीच्या चालकांनीं आजवर केलेली कामगिरी प्रशंसनीय आहे व त्याबद्दल मी चालकांना धन्यवाद देतों."

अध्यक्षांचे वरील आशयाचें भाषण झाल्यानंतर सोसायटीचे सेक्रेटरी रावसाहेब ह. रा. कुकनूर यांनीं अध्यक्षांचे व उपस्थित असलेल्या मंडळींचे आभार मानले. शेवटीं अल्पोपहार व स्त्रियांसाठी हळदी-कुंकू व तिळगुळ समारंभ झाला. पुढें या महोत्सवानिमित्त दिनांक १८ जानेवारी, १९५९ रोजीं सभासद व त्यांची कुटुंबीय मंडळी यांचें एक स्नेहसंमेलनहि भरविण्यांत आलें होतें.

**शहाळयाची किंमत ३०० रुपये**— युगोस्लाव्हिआचे अध्यक्ष मार्शल टिटो सिलोनमध्यें दौऱ्यावर असतां एका नारळाच्या बागेजवळ थांबले व त्यांनीं शहाळयांतील पाणी प्राशन केलें. पाणी पिऊन झाल्यावर ज्या छोट्या मुलीनें त्यांना शहाळे दिले तिच्या हातावर १०० रुपयांच्या तीन कोऱ्या नोटा त्यांनीं ठेवल्या.

**केरळकडून काथ्याचा माल घेणार**—रशिअन सरकारनें केरळकडून ४० लाख रुपये किंमतीचा काथ्याचा माल विकत घेण्याचें ठरविलें आहे. ह्यापूर्वी रशिआनें २५ लाख रुपये किंमतीचा काथ्याचा माल घेतला होता. केरळमध्यें दरसाल १० कोटी रुपयांचा माल तयार होतो. पण त्याच्या विक्रीची पंचाईत होते. रशिआकडून मागणी कायम राहिल्यास बऱ्याच लोकांचा रोजगार टिकून राहील.


**फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या सभासदांकरितां**

## सूचना

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची विशेष साधारण सभा रविवार, दिनांक १ मार्च, १९५९ रोजीं दुपारीं ४ वाजतां बँकेच्या मुख्य कचेरीचे सभागृहांत भरणार आहे.

सदर सभेमध्यें खालील कामें करण्यांत येतील.

(१) मा. बोर्डानें पोटनियम नं. ३३ मध्यें सुचविलेल्या व मान्य केलेल्या दुरुस्तीचा विचार करणें.

(२) मा. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं नियमांत केलेल्या खालील दुरुस्त्या पोटनियम नं ७७ अन्वयें माहितीसाठी सादर (दि. १४-९-१९५८ चे वार्षिक साधारण सभेंत तहकूब झालेल्या.)

(१) नोकरीचे नियम नं. ६५ (ड) व नवीन नियम नं. ७७ (ब).

(२) शेतीच्या, औद्योगिक व उद्दीम मालाचे तारणावर सोसायट्या व व्यक्तिशः सभासदांना कर्ज देण्यासंबंधीचे नियमांपैकीं नियम नं. २ मधील दुरुस्ती.

(३) सेफ डिपॉझिट लॉकर्स भाड्यानें देण्यासंबंधीचे नियमांपैकीं नियम नं. १ मधील दुरुस्ती.

(३) मा. अध्यक्षांचे परवानगीनें ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें, अशी विनंती आहे.

पुणें २.<br>दि. ७-२-५९

बोर्डाचे हुकुमावरून,<br>वा. ग. अळतेकर,<br>मॅनेजिंग डायरेक्टर.

सभेचें स्थळ<br>पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,<br>लक्ष्मी रोड, पुणें २.



**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें २.**

## — नोटीस —

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेचे भागीदारांची २४ वी वार्षिक साधारण सभा गुरुवार दिनांक ५ मार्च, १९५९ रोजीं दुपारीं ४ वाजतां (स्टँ. टा.) बँकेचे रजिस्टर्ड ऑफिस, महाराष्ट्र बँक इमारत ११७७ बुधवार पेठ पुणें शहर या ठिकाणीं नेहमींचे कामकाजासाठी म्हणजे ३१ डिसेंबर १९५८ चा ताळेबंद व नफातोटापत्रक यांचा विचार करणें, डिव्हिडंड मंजूर करणें, निवृत्त होणारे संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें, हिशेबतपासनिसांची नेमणूक करणें वगैरेसाठी व कांहीं विशेष स्वरूपाचे कामकाजासाठी भरेल. सभेपुढें येणारे विशेष स्वरूपाचे कामकाजाचा तपशील भागीदारांस बँकेचा दि. ३१ डिसेंबर, १९५८ अखेरचा ताळेबंद व नफातोटापत्रक व संचालकांचा अहवाल यांसोबत स्वतंत्रपणें पाठविण्यांत आला आहे.

पुणें,<br>२९ जानेवारी १९५९

बोर्डाचे हुकुमावरून,<br>सी. व्हां. जोग<br>मॅनेजर,

बँकेचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें दिनांक २३ फेब्रुवारी, १९५९ ते दिनांक ६ मार्च, १९५९ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर ते शनिवार, दिनांक १४ मार्च, १९५९ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंट्स भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यांवर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## बुडीत कर्ज उत्पन्नांतून केव्हां वजा करतां येतें ?

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

**बुडीत कर्ज उत्पन्नांतून वजा करतां येतें परंतु तसें करण्यापूर्वी तें कर्ज बुडीत आहे अशी नोंद हिशेबाच्या वहींत केली असली पाहिजे.**

असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या बँकेचे १९४७ सालीं दिवाळें निघालें. १९४८-४९ या प्राप्तीकर आकारणीच्या वर्षाचें उत्पन्न लिक्विडेटरनें प्राप्तीकर खात्याला कळविलें. प्राप्तीकर आकारण्याकरितां बँकेचें उत्पन्न किती हें ठरवितांना बुडीत कर्जाची रक्कम रुपये २८,२५,६८९ ही उत्पन्नांतून वजा करण्यांत यावी असें लिक्विडेटरचें म्हणणें होतें. ही रक्कम उत्पन्नांतून वजा करतां यावयाची नाही असें ट्रायब्युनलचें मत असल्यामुळें या प्रश्नावर हायकोर्टाला रेफरन्स करण्यांत आला.

हायकोर्टांत बँकेतर्फे एक मजेदार मुद्दा मांडण्यांत आला. वरील बुडीत कर्जे बुडीत आहे अशी नोंद बँकेच्या हिशोबाच्या वहींत लिक्विडेटरनें केलेली नव्हती. बँकेचें दिवाळें निघाल्यानंतर आपला नेहमीचा व्यवहार बँक करीत नव्हती. येणें असलेली रक्कम लिक्विडेटर गोळा करीत होता आणि सावकाराचें देणें देऊन टाकीत होता. अशा परिस्थितींत नेहमींचा व्यवहार करणाऱ्या बँकेला जें कर्ज तें बुडीत आहे तें बुडीत म्हणून आपल्या हिशेबाच्या वहींत लिहितां आलें असतें. तें तसें करणें लिक्विडेटरला शक्य झालें नाहीं.

बुडीत कर्जे बुडीत आहे अशी नोंद बँकेच्या हिशोबाच्या वहींत न करण्याला कांहींहि कारणें असली तरी प्रश्न असा उद्भवतो कीं, अमुक एक कर्ज बुडीत आहे ( bad debt ) अशी नोंद हिशेबाच्या वहींत केली नसतांना प्राप्तीकर कायद्याच्या ( Income-tax Act ) कलम १० ( २ ) खालीं तें कर्ज बुडीत आहे अशी मागणी करतां येईल काय ?

प्राप्तीकर कायद्याच्या कलम १० (२) चा आशय पुढीलप्रमाणें आहे—

"बँकेनें अथवा सावकारानें आपल्या नेहमींच्या व्यवहारांत दिलेलें कर्ज वसूल होण्यासारखें नाहीं असें जर इन्कम्-टॅक्स अधिकाऱ्याला वाटलें तर तें कर्ज उत्पन्नांतन वजा करतां येईल परंतु हिशेबाच्या वहींत बुडीत कर्ज म्हणून लिहिलेल्या रकमेपेक्षा ती रक्कम जास्त असणार नाहीं."

यावरून असें दिसून येईल कीं, जें कर्ज वसूल होण्यासारखें नाहीं असें इन्कम्-टॅक्स अधिकाऱ्याला वाटलें तेंच कर्ज बुडीत कर्ज या सबबीवर उत्पन्नांतून वजा करतां येतें. तें कर्ज वसूल होण्यासारखें नाहीं याबद्दल इन्कम्-टॅक्स अधिकाऱ्याची खात्री पटली पाहिजे. तसेंच ती रक्कम असेसीनें आपल्या हिशेबाच्या वहींत बुडीत म्हणून लिहिलेल्या रकमेपेक्षा जास्त असणार नाहीं. तेव्हां एखादें कर्ज बुडीत आहे या सबबीवर तें उत्पन्नांतून वजा करण्यापूर्वी तें बुडीत आहे असें असेसीनें आपल्या हिशेबाच्या वहींत लिहिलें असलें पाहिजे.

बँकेतर्फे हायकोर्टांत असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, अमुक एक कर्ज बुडीत आहे असें असेसीनें आपल्या हिशेबाच्या वहींत लिहिणें आवश्यक आहे असें कलम १० (२) मध्यें कोठेंच म्हटलेलें नाहीं. अमुक एक कर्ज बुडीत आहे असें जर असेसीनें आपल्या हिशेबाच्या वहींत लिहिलें असेल तर मात्र त्या रकमेपेक्षा जास्त रक्कम बुडीत म्हणून इन्कम्-टॅक्स अधिकारी दाखवू शकत नाहीं. परंतु एखादें कर्ज बुडीत आहे असें जरी असेसीनें आपल्या हिशेबाच्या वहींत लिहिलेलें नसलें तरी जर तें वस्तुतः वसूल होण्यासारखें नसेल तर तें कर्ज बुडीत म्हणून दाखवूं देण्याला इन्कम्-टॅक्स अधिकारी नाकारूं शकत नाहीं. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, अमुक एक कर्ज वसूल होण्यासारखें नाहीं असें जर असेसीनें शाबीत केलें तर जरी तें कर्ज बुडीत आहे असें आपल्या हिशेबाच्या वहीत असेसीनें लिहिलें नसलें तरी तें कर्ज बुडीत आहे या सबबीवर तें उत्पन्नांतून वजा करावें असें असेसी म्हणूं शकतो. प्रस्तुत केसमधील परिस्थितींत लिक्विडेटरला वरील कर्ज बुडीत आहे अशी नोंद हिशेबाच्या वहींत करणें शक्य झालें नाहीं. वरील कर्ज वसूल होण्यासारखें नसूनसुद्धां केवळ तें बुडीत आहे अशी नोंद हिशेबाच्या वहींत केली गेली नसल्यामुळें तें कर्ज बुडीत आहे असें दाखवितां येणार नाहीं असें म्हणणें वेडगळपणाचें होईल.

वरील युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला नाहीं. युक्तिवाद जरी जोरदार असला तरी आपणांस कलम १०(२) मध्यें वापरलेल्या भाषेकडे पाहिले पाहिजे. बँक अथवा सावकारीचा धंदा करणारा इसम याचें उत्पन्न त्यानें आपल्या हिशेबाच्या वहींत केलेल्या नोंदीवरूनच ठरवितां येईल. कर्ज जर बुडीत असलें तर त्याचा परिणाम उत्पन्न घटण्याकडे होईल. तेव्हां अमुक एक कर्ज बुडीत आहे या सबबीवर प्राप्तीकर कायद्याच्या कलम १०(२) खाली तें उत्पन्नांतून वजा करण्यांत यावें असें म्हणण्यापूर्वी आपल्या हिशेबाच्या वहींत तें कर्ज बुडीत आहे असें असेसीनें लिहिलें असलें पाहिजे असें मत हायकोर्टानें दिलें.

एखादें कर्ज जर बँकेनें अथवा सावकारानें दिलें आणि तें वसूल होण्यासारखें नसेल तर तें बुडीत कर्ज ( bad debt ) म्हणून प्राप्तीकर कायद्याच्या ( Income-tax Act ) कलम १० (२) खाली उत्पन्नांतून वजा करतां येतें. परंतु तसें करण्यापूर्वी आपल्या हिशेबाच्या वहींत तें कर्ज बुडीत आहे अशी नोंद त्या बँकेनें अथवा सावकारानें केलेली असली पाहिजे. तशी नोंद जर केलेली नसेल तर तें कर्ज बुडीत आहे या सबबीवर उत्पन्नांतून वजा करतां येणार नाहीं.

—"न्यायबोध" जानेवारी, १९५९.

---

### आठ फेब्रुवारीपासून सहावा अ. भा. हातमाग सप्ताह

भारतांत ८ फेब्रुवारी, १९५९ पासून सर्वत्र सहावा अ. भा. हातमाग सप्ताह साजरा करण्यांत येईल.

या सप्ताहांत जाहीर सभा, मिरवणुकी, प्रदर्शनें, विक्री, भांडारांची रोषणाई आणि विविध माध्यमांद्वारें हातमागाच्या प्रचाराचें कार्यक्रम करण्यांत येतील

देशाच्या आर्थिक घडींत हातमाग धंद्यास किती महत्त्वाचें स्थान आहे याकडे जनतेचें लक्ष वेधणें हा हेतु हा सप्ताह साजरा करण्यामागें आहे. या धंद्यामुळें लक्षावधि लोकांना रोजगार मिळालेला आहे. या प्राचीन कुटीरोद्योगाचा विकास साधण्यासाठी जनतेचें अधिक सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न सदर सप्ताहांत करण्यांत येतील.

अनेक राज्यांच्या राजधान्यांच्या ठिकाणीं व महत्त्वाच्या हातमाग केंद्रांत हातमाग विणकरांसाठी स्पर्धा ठेवण्यांत येऊन सर्वोत्कृष्ट हातमागी कापड व नमुने यांस पारितोषिकें दिलीं जातील.

---

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.